
ebook
हरहुन्नरी
किशोर कुमार
लेखक - अनंत पावसकर
ई साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com
esahity@gmail.com

मराठीतील पहिले ई बुक निर्माते अशी ख्याती असलेले श्री अनंत पावसकर यांनी लिहिलेले व निर्मित केलेले हे हरहुन्नरी किशोर यांच्या स्मृतींचे पुस्तक ई साहित्यच्या वाचकांसमोर ठेवताना आम्हाला आनंद होत आहे.

या पुस्तकाबद्दलच्या आपल्या प्रतिक्रिया श्री अनंत पावसकर यांना कळवाव्यात

मोबाईल – 98200 22417

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

ई प्रकाशक: ई साहित्य प्रतिष्ठान

ईलेवन्थ फ़्लोअर,
ईटर्निटी,
ईस्टर्न एक्स्प्रेस हायवे, ठाणे

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य पुस्तके मिळवण्यासाठी आपले नाव आणि गाव Whatsapp करा)

# हरहुन्नरी 'किशोर कुमार'


★ लेखक : अनंत पावसकर



महिन्याची पहिली तारीख म्हटली की, नुसताच हवाहवासा वाटणारा पगाराचा दिवस अथवा तळीरामांसाठी नक्कोसा वाटणारा ड्राय-डेच नसतो काही! पहिली तारीख आणखी एका गोड कारणासाठी सोहळ्याची ठरते. मला आठवतं. प्रत्येक महिन्याची पहिली तारीख आली की अगदी लहानपणी आम्ही भावंडं हटकून शेजारच्या काकांकडे सकाळी सात-सव्वासातला हक्कानं जायचो. हे काका रेडिओचे दीवाणे असल्याने त्यांना चाळीत 'रेडिओकाका' म्हणत असत. सकाळी साडेसातच्या ठोक्याला आम्हां आबालवृद्धांच्या आवडीचं गाणं लागणार म्हणून ते आम्हां मुलांची जणू वाटच पाहत असायचे. महिन्याची पहिली तारीख साजरी करण्याची त्यांची आपली एक पध्दत होती, म्हणा ना! किशोरकुमार गात असायचा.. 'दिन है सुहाना, आज पहिली तारीख है, खुश है जमाना आज पहिली तारीख है..'. (पहली तारीख - १९५४) छोट्याशा वाटीत काकीनं केलेल्या कांदेपोहे, बिस्किटं वगैरेंचा फडशा पाडता पाडता त्या खुशखुशीत गाण्यानं सकाळ साजरी व्हायची. पगाराचा दिवस असल्याने 'रेडिओकाका' टेबलाच्या कोपऱ्यावर खुशीने ठेका देताना दिसायचे. आज आपले बाबा घरी येताना आमच्यासाठी खास खाऊ आणणार म्हणून आम्ही मुलंही खुश असायचो. गाणं संपलं की धूम ठोकायचो, शाळेत जायची तयारी करायला! गाणं गुणगुणतच शाळेचा रस्ता कापायचो. निवेदनाकडे लक्ष नसल्याने ते गाणं एस.डी. किंवा सी.रामचंद्र वगैरे बुजुर्ग संगीतकारांनी केलं असावं हा (गैर)समज तब्बल दहा वर्षे कायम होता, पण नंतर शेजारच्या दादाने चोरबाजार पालथा घालून

त्या गाण्याची रेकॉर्ड मिळवताच आश्चर्य वाटलं. गीतकार कमर जलालाबादी आणि संगीत.. सुधीर फडकेऽऽ! 'गीत रामायण' गातात ते? आपले बाबुजी??

'दैनिक सामना' च्या 'फुलोरा' या पुरवणीतील.. 'आठवणीतली गाणी' या माझ्या स्तंभात 'दिन है सुहाना, आज पहिली तारीख है..' हे गाणं घ्यावं म्हणून मी बाबुजींना फोन करून त्यांची भेट घेण्याचं ठरवलं. स्वारी सावरकरांच्या चित्रपटात पूर्णपणे मसरूफ होती. पण गप्पा झाल्या.. 'नवीनच होता तो इंडस्ट्रीत. अशोककुमार घरच्यासारखाच असल्याने ओळख होती..' बाबुजी उत्साहाने किशोरच्या आठवणी सांगत होते.. 'अशोकचा तो धाकटा भाऊ आहे आणि तो उत्तम गातो असंही कानावर आलेलं. 'कमल चित्र' या संस्थेचं हे पिक्चर. राजा नेनेच दिग्दर्शक व हीरोच्या रोलमध्ये होते. सोबत होती निरूपा रॉय, वसंतराव पहेलवान. विनोदी भूमिकेत असलेल्या आगावर एखादं चागलं गाणं करावं अशी चर्चा झाली. आगाची भूमिका संसारात पिचलेल्या माणसाची. कमरभाईंनी चर्चेअंती दिलेल्या सिच्युएशनप्रमाणे उत्तम गाणं लिहिलं. सी. रामचंद्रकडून गाऊन घ्यावं असं ठरतंय तोच किशोर 'ट्राय' करायला काय हरकत आहे असं एक मत पुढे आलं. नाहीतरी मी त्याची 'जिद्दी', 'हमारा घर' वगैरे पिक्चरची गाणी ऐकलीच होती. दोनेक सिनेमातला त्याचा उत्तम अभिनयही पाहिला होता. लोकप्रिय होण्याच्या मार्गावर असलेला किशोर रिहर्सल्सला आला. तो खूप मस्तीखोर असल्याचं ऐकून होतो पण अगदी आज्ञाधारक विद्यार्थ्यासारखा मनाची पाटी कोरी करून समोर मांडी घालून बसला. मी गाण्याचं चलन सांगितलं. त्याने काव्याचा कागद घेऊन चार-पाचदा गाऊन दाखवलं. 'एक्स्प्रेशन्स टाकू का?' असंही म्हणाला. नाहीतरी आगाची प्रतिमा विनोदी अंगाचीच. माझ्या आणि गीतकाराच्या संमतीने तो एकेक 'ॲडिशन' टाकत राहिला आणि सरतेशेवटी एक मस्त गाणं जमून गेलं. गरिबीचं जीणं, मिलबाहेरच्या पठाणाचा पगारादिवशीचा तगादा, कंजूष शेठ, एकीकडे बायकोला पिक्चर दाखवायचं दिलेलं वचन आणि समोर साक्षात 'पाच आनेका दस आना' असा तिकिटांचा काळाबाजार, घरी पोहोचताच पोरांचे चोचले पुरवणारा खाऊ असं खरंखुरं वाटणारं चित्रण होतं.. त्या आशयघन गीतात. आगाचे हावभाव करत रेकॉर्डिंग स्टुडिओतला धसमुसळेपणा करणारा किशोर अजून आठवतो मला! उत्तम अभिनयपूर्ण गाणं करावं ते यानेच..' मी त्यांना हळूच विचारलं.. 'बाबुजी.. तुमच्याकडे ते गाणं आहे का?..' म्हणाले.. 'जुनी रेकॉर्ड होती पण आता नाहीय माझ्याकडे!..' बाबुजींनी दीर्घ सुस्कारा सोडला. मी मनोमन ठरवलं. 'फुलोरा'त ८ ऑक्टोबर, १९९४रोजी तो लेख प्रसिध्द होताच हे गाणं, अधिक किशोरची 'मरने की दुवायें..'सकट इतर दुर्मीळ गाणी एका कॅसेटवर मुद्दाम टेप करून घेत बाबुजींना नेऊन दिली. बाबुजी कसले आनंदलेत म्हणून सांगू?



किशोरकुमार यांचं खरं नाव 'आभासकुमार गांगुली'. मध्य प्रदेशातील खांडवा गावात. शनिवार, दि. ४ ऑगस्ट, १९२९ रोजी गांगुली या बाह्मण कुटुंबात जन्मलेला आभास, हा बुजुर्ग अभिनेते अशोककुमारजींचा सर्वात धाकटा बंधू. वडिलांचं नाव कुंजलाल आणि आई गौरीदेवी. घरची चांगलीच श्रीमंती. वडिल पेशानं वकील होते. त्यांना चार मुलं. कुमुदलाल (अशोककुमार), मुलगी सतीदेवी, अनुपकुमार (मूळ नाव कल्याणकुमार गांगुली) आणि सर्वात धाकटा आभासकुमार. शेंडेफळ असल्याने आभास अतिशय लाडात वाढलेला. १९३४सालच्या दरम्यान मोठ्या कुमुदलालने (अशोककुमारने) चित्रपटसृष्टीत आपलं नशीब आजमावायला मुंबईकडे कूच केलेलं. आभास तेव्हा केवळ पाचेक वर्षांचा होता. आभासचा लहानपासूनचा 'आयडॉल' होता तो कुंदनलाल सैगल. त्यांची गाणी पाठ करून गाणं, हाच एक छंद. कुमुदलालने 'अशोककुमार' हे नाव धारण करून अभिनयाचं क्षेत्र स्वीकारत 'जीवन नैया' तसेच 'अछुत कन्या' हे सिनेमे करताच गावाकडे थोडीशी खळबळ उडालेली. परंतु त्यांचं नाव आपल्या पंचक्रोशीतच नव्हे तर सर्वत्र गाजतंय म्हणता विरोध मावळला. धाकटा 'आभास' आता दादामुनींची (अशोककुमार) गाणी तोंडपाठ म्हणू लागला. 'मैं बनका पंछी..' तर त्याचं खासच. दादामुनी आता एक गायकनट म्हणून स्थिरावला आहे, स्टार झाला आहे हे लहानग्या आभासला कळताच केवळ त्याच्या हट्टापोटी गांगुली कुटुंब मुंबईला वरचेवर भेट देऊ लागलं. 'आभासच्या' आवाजात मिठास होती हे सर्वप्रथम त्याच्या आजोबांना जाणवलं होतं. गाणं स्वतःच्या स्टाईलनं आणखी तिखट-मिठ लावून ('इम्प्रोवाईजेशन') कसं गायचं हे तर आपला नातूच जाणे असा सार्थ अभिमान होता त्यांना. आभासकुमार खांडवा गावातील, त्यांच्या राहत्या घरापासून काही अंतरावरच.. दुथडी भरून वाहणाऱ्या 'आबना' नामक नदीच्या काठी बसून मोठ्यानं गाणी म्हणताना पलिकडच्या जंगलात लांबवर दोन हरणं एकाच जागी थिजून, कान टवकारून आणि मोठ्ठाले डोळे करून आपल्या नातवाकडे बघतायत हे त्यांनी आपल्या डोळ्यांनी पाहिलेलं! जो स्वैर धावणाऱ्या जनावरांचे पाय थबकवू शकतो तो नक्कीच आपल्या गाण्याने लोकांच्या काळजाचे ठोके चुकवणार..!' ही आठवण दस्तुरखुद्द किशोरदांनीच.. गप्पांच्या ओघात कल्याणजी-आनंदजींना खुलासेवार सांगितली होती. दोनेक वर्षांनंतर आभासने मुंबईला येऊन दादामुनींकडेच मुक्काम ठोकायचं ठरवलं. याच काळात दादामुनींच्या तोंडून आभासकुमारचा 'किशोरकुमार' असा नामोल्लेख करण्यात येऊ लागला. छोटा किशोरकुमार आपल्या दादामुनींच्या गाण्यांच्या ध्वनिमुद्रणाच्या वेळी कोरसमध्ये उभा असायचा. 'गयी रात, आयी प्रभात, निद्रासे हम जागे..' या 'जन्मभूमी'च्या गाण्यात कोरसमध्ये गाणारा सात-आठ वर्षे वयाचा कोवळा किशोरकुमार 'बॉम्बे टॉकिज' च्या आवारात कौतुकाचा विषय असे. आपल्या खुशमिजाज वागण्यानं आणि दिलखुलास व्यक्तिमत्त्वानं त्याने सर्वांनाच आपलसं केलं होतं. नक्कलखोर नाना कळा, मुखोद्गत असलेल्या सगळ्या गाण्यांची चिरफाड करत सादरीकरण करण्याची हातोटी लोकांना खूप आनंद देत असे. किशोरला 'ॲक्टर' म्हणून पहिला 'ब्रेक' मिळाला तो १९४६च्या 'शिकारी' या चित्रपटात. अशोककुमार प्रमुख भूमिकेत होते. सतरा वर्षे वयाच्या किशोरची भूमिका छोटीशी होती खरी पण पदार्पण झकासच झालेलं म्हणायचं. चित्रपट पूर्ण झाल्यानंतर श्रेय नामावलीत अशोककुमारचे मेहुणे आणि फिल्मिस्तानचे भागीदार शशधर मुखर्जी यांनी आभासकुमारचा - किशोरकुमार करून टाकला. त्याचं गाण्याचं वेड पाहून दोनेक वर्षातच संगीतकार खेमचंद प्रकाशजींनी 'जिद्दी' (१९४८) या चित्रपटात एक गाणं गायची संधी दिली. यात देव आनंद लीड रोलमध्ये तर नायिका होती कामिनी कौशल. किशोरने या सिनेमात छोटीशी भूमिकाही केलेली. (म्हणजेच देव आनंद आणि किशोरदा यांनी रुपेरी पडदा एकत्र शेअर केलेला हा पहिलाच सिनेमा!) प्रो. जज्बीसाहेबांनी लिहिलेलं 'मरने की दुवायें क्यूँ मांगू, जीने की तमन्ना कौन करे..' या गाण्याला स्वरसाज होते खेमचंद प्रकाशजींचे. (सुदैवाने हे गाणं सहज उपलब्ध आहे.) खेमचंदजी किशोरच्या सैगलाळलेल्या आवाजावर नाखूष होते, पण त्या गाण्याचं चलनच असं होतं की किशोरकुमार अक्षरशः सैगल स्टाईलने गायलाय हे गाणं. खेमचंदजींनी त्याला याच सिनेमात लताबरोबर एक युगलगीत सुध्दा गायचा मौका दिला. 'ये कौन आया रे, कर के सोलह..'! नंतर खेमचंदजींनी त्याला बऱ्याच कानपिचक्या दिल्या. पुढच्याच 'रिमझिम' (१९४९) या किशोर साहू व रमोला अभिनीत चित्रपटात 'जगमग जगमग करता निकला.. चाँद पूनमका..' या भरत व्यासजींनी लिहिलेल्या गाण्याच्या सादरीकरणातला किशोर थोडासा बदलल्याचं जाणवतं. खेमचंदजी छडी घेऊन उभे होते की काय कुणास ठाऊक पण किशोरला ती कोंडी फोडण्यास त्यांनी उद्युक्त केलं एवढं मात्र नक्की. एकदा संगीतकार सचिनदा 'मशाल' (१९५०)च्या कामानिमित्त अशोककुमारच्या घरी सहजच गेले होते. अचानक कुंदनलाल सैगलजींचा आवाज त्यांच्या कानावर पडला. सैगलजी इथे अशोककुमारच्या घरी काय करतायत? असं भलमोठं प्रश्नचिन्ह चेहऱ्यावर वागवत त्यांनी नोकराला विचारलं.. नोकरानं

सांगितलं. 'सैगलसाहब नही.. दादामुनी के छोटे भाईसाब गा रहे..' ते थक्क झाले! किशोरला भेटून त्याच्या गाण्याचं, आवाजाचं कौतुक केलं. म्हणाले.. 'मी तुझी गाणी ऐकलीयत. तू संगीताचं शास्त्रोक्त शिक्षण घेतलं नाहीस, हेही मला माहीत आहे. पण एक सांगू? गात रहा! सतत गात रहा. मात्र सैगलसाहेबांची कॉपी करण्यापेक्षा, तू स्वतःची अशी स्टाईल शोध. दोनेक आठवड्यांनंतर तू मला जरा निवांतपणे नक्की भेट, बघुया काही जमतं का!.. ' एकविशीतल्या किशोरने बुजुर्ग सचिनदांचं म्हणणं लक्षात ठेवलं. खेमचंदजींनी सुध्दा त्याला डोस दिलाच होता, आता सचिनदाही सांगतायत म्हणता त्यात नक्कीच तथ्य असावं असा सरळसोट विचार केला. घरात विविध हिन्दुस्थानी-पाश्चिमात्य गायकांच्या रेकॉर्डस्चा भरपूर स्टॉक होता. फावल्या वेळात ते ऐकण्याचा सपाटाच लावला. एक दिवस थोरल्या अनूपने अचानक 'यॉडेलिंग"मध्ये माहीर असलेल्या 'जिमी रॉजर्स' या पाश्चिमात्य गायकाच्या रेकॉर्डस् आणून दिल्या. गाण्यातले विविध देशी-परदेशी प्रकार गवसताच आता झपाटलेल्या किशोरने होमवर्क सुरू केलं. 'यॉडेलिंग" करणारा किशोरकुमार बहुदा याच काळात आकाराला येत असावा, असं वाटतंय! पाश्चिमात्य गायकाच्या स्टाईलवर त्याने बऱ्याच बारकाईनं अभ्यास केला. तो मॅच्युअर होत होता. संगीतकार चित्रगुप्त यांनी संगीत दिलेल्या 'हमारा घर' (१९५०) या फिल्मचं 'कहाँ चले सरकार..' हे शमशाद बेगमबरोबरचं त्याचं युगलगीत यामुळेच काहीसं मुक्त वाटतं. १९५०ला 'मुकद्दर' लागला. नलिनी जयवंत व सज्जन प्रमुख भूमिकेत तर किशोरचा रोल होता स्टेजवर नाचगाणी करणाऱ्याचा. मस्त स्कोप होता त्याला. गीतकार राजशेखरजींचं 'आती है याद जनवरी फरवरी..' तर भरत व्यासजींचं 'एक दो तीन चार, बागो में आयी बहार..' ही दोन युगलगीतं खेमचंदजी व सचिनदांच्या कानपिचक्यांनी किशोरच्या आवाजात किती बदलाव आणला तेच ठळकपणे सांगतात. अर्थात याचं थोडंसं श्रेय आपण सहगायिका आशादीदांना तसंच खेमचंदजींचे सह-संगीतकार भोला श्रेष्ठ (सध्या प्रकाशझोतात असलेली गायिका पूर्णिमा - म्हणजे आमची लाडकी दीदी.. सुषमा श्रेष्ठ हिचे वडिल) व जेम्स सिंह यांनाही द्यायला हरकत नाही. जाणकार असं म्हणतात की.. या दोन गाण्यांमध्ये 'यॉडेलिंग" सदृश अदाकारीची बेसिक झलक पुरेपूर आढळते. नंतर किशोर खूप आशेने सचिनदांना भेटायला गेला. सचिनदा तेव्हा राज कपूर-नर्गिस या जोडीचा सनराईज पिक्चर्स कृत 'प्यार' (१९५०) या सिनेमाची गाणी कंपोज करण्यात व्यस्त होते. सचिनदांना आधी राज कपूर अभिनीत 'दिल की रानी' (१९४७) हा सिनेमा मिळाला होता. सचिनदांनी या चित्रपटात चक्क राज कपूरवर चित्रित होणारं गाणं त्यालाच गायला लावलं होतं. 'ओ दुनिया के रहनेवाले..' हे गीतकार यशोदानंदन जोशी यांचे गीत राज कपूरने गायलं खरं पण तोपावेतो त्याला प्लेबॅक नक्की कोणत्या गायकाचा द्यायचा यावर शिक्कामोर्तब झालं नव्हतं. राज कपूर म्हटलं की आपल्या ओठावर नाव तरळतं ते मुकेशजींचंच. कधी कधी चवीपुरते मन्नादा (चोरी चोरी - १९५६ संगीत : एस.जे.) तर कधी रफी सुध्दा (आठवा 'अंदाज' -१९४९, संगीत : नौशादजी) पण राज कपूरजींसाठी पार्श्वगायक 'किशोर'? येस! सचिनदांनी किशोरला अनुबंधित केलं होतं. राजेंद्र कृष्णजींच्या गीतलेखनाला स्वरसाज आहेत ते सचिनदांचे. 'कच्ची पक्की सडकों पे मेरी..' हे राज कपूरच्या तोंडी असलेलं छेडछाड टाईप गाणं तर दुसरं 'जलती है दुनिया तेरा मेरा प्यार..' हे शमशाद बेगमबरोबर गायलेलं लव्ह-साँगही आहे. सचिनदांनी त्याच्या आवाजात 'मुहोब्बत का छोटासा आशियाना..' हे धीरगंभीर प्रकृतीचं गाणंही केलंय पण त्याला सैगलचा पुसटताही स्पर्श नाहीय. म्हणजे किशोर सैगलच्या जोखडातून जणू मुक्त झाला होता. त्याची गायन-क्षितिजं याच टप्प्यावर झपाट्यानं विस्तृत होऊ लागली होती.





'यॉडेलिंग' म्हटलं की चटकन नाव डोळ्यासमोर येतं? ते कुणाचं तर किशोरदांचंच! अर्थात एकेक गायकाच्या व त्यांच्या एकेक गाण्याची गोष्ट, अगदी बारकाईने अधोरेखित करणाऱ्या रसिकांना हे मान्य नाही! 'महंमद रफीसाहेब' आणि 'किशोरदा' यांची 'यॉडेलिंग' प्रकारातली काही गाणी, अगदी पोटतिडकीने या रसिकांनी 'यू-ट्युबवर' टाकली आहेत.. यावर वाद नको..! कारण या स्वरदेवतांच्या गाण्यांनीच आपल्या धकाधकीचं जीवन सुसह्य केलं आहे! (मी ही 'प्ले-लिस्ट' सुद्धा दिलीय! नक्की पहा. आनंद घ्या!!) मी 'व्हीनस' या मातब्बर म्युझिक कंपनीतील माझ्या व्यवस्थापनाच्या कारकिर्दीत 'व्हर्शन्स'चे बरेच 'प्रोजेक्टस्' करवून घेतले आहेत. (याबाबगत सहजच.. आठवण म्हणून सांगतो.) तुम्हाला आठवतंय? तेव्हां.. म्हणजे १९९० दरम्यान.. 'ऑडिओ-कॅसेट' विश्वात एक नवा 'ट्रेण्ड' सुपरहिट झाला होता. 'सोनी' कंपनीच्या '६० मिनिटे व ९० मिनिटे ड्युरेशनच्या' कॅसेटस् बाजारात दाखल झाल्या होत्या. सर्व गायकांची, चित्रपटांची तसेच विविध विषयावरच्या गाण्यांच्या कॅसेटस्.. मुंबईतील 'ग्रॅंटरोड' विभागात खुलेआम शेकडो स्टॉल्सवरून विकल्या जात असत! त्यांची जबरदस्त विक्री होत असे! आखाती देशातील कुणा रसिकांनी, 'कॅसेटस्'चं युग येताच.. गाण्यांच्या सादरीकरणात अनेक प्रकार बाजारात आणले होते. (याचं मूळ चक्क दुबईत होतं..बरं!) हा प्रकार, चक्क आपल्या भारतीय 'कॉपीराईटस् कायद्यानुसार' अक्षरशः 'अवैध' होता. ती चक्क 'पायरसी' होती! परंतु त्यांचा तो आवाका जबरदस्त होता. यातून अनेक 'कॅसेटस्चे विक्रेते' चक्क करोडपती झाले. रेकॉर्डस्चा संग्रह असलेल्यांची तर चांदीच झाली. आपल्या आवडीच्या गाण्यांची यादी बनवायची.. ती यादी घेऊन 'ग्रॅंटरोड' विभागातील अमुक ठिकाणी जायचं व ती गाणी रेकॉर्ड करून घ्यायची. काम फत्ते! मात्र नंतर 'कॉपीराईटस्' कायद्याचा नेमका बडगा येताच.. त्या संबंधितांचे धाबे दणाणले. मग काय! यातून कायदेशीर व वैध मार्ग शोधण्यासाठीच.. म्हणा.. 'व्हर्शन्स' करायची आणि त्या कॅसेटस् बाजारात टाकायचा सपाटा, म्युझिक कंपन्यांनी सुरू केला. याच स्फुलिंगामुळे आपल्या मुंबईत अनेक 'म्युझिक कंपन्या' उदयास आल्या. हे सत्य आहे. (मात्र पुढची अनेक वर्षे.. 'इंपोर्टेड कॅसेटस् वर' आपल्या आवडीची गाणी रेकॉर्ड करून घेणं, हे सुरूच होतं.) तर.. रफीसाठी आमच्याकडे अशोक खरे, बंकिम पाठक असे गुणी गायक होते. नंतर त्यात उदयोन्मुख असा मोहम्मद सलामत सुद्धा सामिल झाला. किशोरसाठी मात्र आमच्याकडे एकंदरीत वाईड चॉईस होता. जिनियस असे सुदेश भोसले, अभिजीत, कुमार शानू, विनोद राठोड.. असे नाव कमावलेले सुप्रसिद्ध गायक उपलब्ध होते. यातला माझा समवयस्क बालमित्र सुदेश भोसले तर डिट्टो 'यॉडेलिंग' करतो, हे अलम दुनियेला माहीत आहे. शानूला थोडंफार जमतं असं ऐकून होतो. पण मित्र असूनही तो 'टी-सिरिज' मध्ये बस्स छा गया था! इतर अनेक जण 'यॉडेलिंग' करत असतील पण रिस्क घेऊ नकोस यार! असं अनेक बुजुर्ग संगीत-संयोजक, वादक सांगायचे. या गायक कलावंतांच्या पोटावर पाय देण्यासाठी ही चमचेगिरी नसायची. तर त्यात खरोखरच तथ्य होतं! इंडस्ट्रीत नाव कमावलेले, अमुक वाद्यांवर हुकुमत असलेले सर्व माहीर वादक, बुजुर्ग-नामचीन संगीत-संयोजक.. सर्व स्तरातल्या गायकांच्या देशातल्या-परदेशातल्या कार्यक्रमांमध्ये वादनासाठी जात असत त्यामुळे 'अंदर की बात..' खरंच त्यांनाच ठाऊक होती, यात शंकाच नाही! कोणत्याही गाण्यांची नव्याने 'व्हर्शन्स' करायची तर त्यात थुक-पट्टी, उन्नीस-बीस नको. माझ्या 'व्हीनस' या मातब्बर कंपनीची 'दिल खोल के..' खर्च करायची तयारी असताना, फालतुगिरी कशाला?!. मजबूत बजेट असल्याने आमचे 'म्युझिक-ट्रॅक्स' तर परफेक्ट असायचे, त्यामुळे चांगला गायक मिळाला.. तर नैया पार होईल, असं वाटणं साहजिकच होतं. 'जुम्मा चुम्मा..' गाण्यासरशी आमचा जिगरी दोस्त सुदेशचं नाव होतं न होतं तोच शानू 'आशिकी'मुळे लाईम-लाईटमध्ये आला. थोड्याच काळात अभिजीत तर चिक्कार गाजला. माझा लाला कॉलेज मधला बालमित्र (बॅचमेट) विनोद राठोडही खूप कामं मिळवू लागला. सगळेच बीझी झाले. त्यांना स्टार-व्हॅल्यू आली. आम्ही 'व्हर्शन्स'साठी.. हा घ्यावा की तो!.. अशा व्दिधा मनःस्थितीत असायचो. पण खरं सांगू? आम्ही किशोरची सोलो व युगलगीतं मिळून शंभर-सव्वाशे गाणी 'व्हर्शन्स' म्हणून केलीत. ती दर्जेदार आणि चांगलीही झालीत, परंतु रिस्क नको म्हणून 'यॉडेलिंग' असलेलं एकही गाणं, आम्ही हेतपुरःसर घेतलेलं नाहीय! किशोरकुमारसारखंच सहीसही 'यॉडेलिंग" कुणाला जमेल की नाही? हा संशय होता. सध्या 'स्टार' झालेल्या या गायकांची 'वाहवा' करावी तरी पंचाईत! चूक काढावी तरी 'टेन्शन'! किशोर तो किशोर, बाकी सब झूठ! हेच खरं!

'यॉडेलिंग' करत गाणं म्हणणं आपल्या हिन्दी सिनेमात नेमकं कुणी आणलं याबद्दल बरेच वेगवेगळे असे मतप्रवाह आहेत. महंमद रफीचे 'फॅन्स', चित्रपटातल्या गाण्यातील 'यॉडेलिंग' हा प्रकार रफीनेच आणल्याचं ठणकावून सांगतात तर

किशोरचे 'फॅन्स' ते क्रेडिट किशोरलाच देतात. आपण या वादात न पडता आधी महंमद रफींच्या 'यॉडेलिंग'बाबत थोडासा ऊहापोह करूया. ठळकपणे आठवायचं तर महंमद रफीने 'आग्रा रोड' या १९५७साली प्रदर्शित झालेल्या चित्रपटात रोशनजींच्या संगीतात 'उनसे रिप्पी टिप्पी हो गयी..' हे युगलगीत गीता दत्तबरोबर गायलेलं. या गाण्यात 'यॉडेलिंग' होतं. नंतर त्यांनी मनोहर नामक संगीतकाराकडे 'डॉक्टर झेड' (१९५९) या चित्रपटात गायलेलं 'हॅल्लो स्वीटी सेव्हनटीन, कैसी है तबीयत..' या सोलो गाण्यात सुध्दा थोडंसं का होईना पण 'यॉडेलिंग' आहे. फिरोजखान नायक असलेल्या 'रिपोर्टर राजू' (१९६२) या सिनेमात रफीने गायलेल्या 'ओ चले हो कहाँ, कहो कोई दास्तां कहो..' या एस. मोहिन्दरने संगीतबध्द केलेल्या गाण्यातही 'यॉडेलिंग' असल्याचं जाणवतं. पुढे १९६४साली उषा खन्नाने संगीतबध्द केलेल्या 'आओ प्यार करे' (१९६४) 'दिल के आईने में तस्वीर तेरी..' या गाण्यातही 'यॉडेलिंग'ची झलक होतीच की! (कृपया सोबत दिलेल्या 'प्ले-लिस्टस्' अवश्य पहा.) आता किशोरदांविषयी! किशोरची सुरूवातीची गाणी पाहिली तर 'आती है याद हमको जनवरी फरवरी..' या 'मुकद्दर' (१९५०) मधल्या गाण्यात थोडासा मोकळाढाकळा किशोर सापडतो. यात 'परफेक्ट यॉडेलिंग' नव्हतं.. पण एक वेगळी झलक सापडते. १९५५ च्या 'जोरू का भाई' (जयदेव) व 'बाप रे बाप' (ओ.पी.) या दोन्ही गाण्यांमध्ये 'यॉडेलिंग' आहे. ओ.पी. नय्यरजींनी संगीत दिलेल्या (किशोरकुमार-चाँद उस्मानी अभिनीत) 'बाप रे बाप' (३० सप्टेंबर, १९५५ रोजी प्रदर्शित) मधल्या आशाताईंसोबतच्या 'पिया पिया पिया.. मोरा जिया पुकारे..' या युगलगीतात जबरदस्त 'यॉडेलिंग' आहे. 'जोरू का भाई' (३१ डिसेंबर, १९५५ रोजी प्रदर्शित.) हा संगीतकार जयदेवजींनी संगीतबद्ध केलेला चित्रपट आहे! यातलं 'काली काली तारोंवाली रात जवाँ है आजा..' नक्की ऐका! गाण्याची सुरूवातच मुळी 'यॉडेलिंगने' होते. ओपी नय्यरजी किशोरदांबरोबर तितकेसे यारी-दोस्तीत कधीच नव्हते पण किशोरकडून त्याच्या आवाजातला 'यॉडेलिंग"चा गुण त्यांनी नेमका हेरलेला, म्हणूनच त्यांना ही किमया साधता आलीय. गायक किशोर कुमारसाठी 'दिन है सुहाना, आज पहिली तारीख है..' (पहली तारीख - १९५४) हे मस्तीभरं गीत मिळणं व नंतर 'पिया पिया.. मोरा जिया पुकारे..' मिळणं हेच 'यॉडेलिंगचे' खरेखुरे 'माईल-स्टोन्स' आहेत. नंतर किशोरला आपल्यामध्ये गवसलेल्या 'यॉडेलिंगच्या' भलताच प्रेमात पडला होता. हा फंडा त्याला इतका बेशुमार आवडला की 'झुमरू' (१९६१)चं शीर्षकगीत गाताना तो नुसता सुटलाय. हे गाणं संपूर्णपणे जणू 'यॉडेलिंग' या विषयालाच वाहिलेलं आहे. किशोरकुमारने, शंकर-जयकिशनजींनी संगीत दिलेल्या 'बेगुनाह' (१९५७) मध्ये 'आज न जाने पागल मनवा..' गाताना 'यॉडेलिंग मस्ती' केल्याचं जाणवतं. मग 'यॉडेलिंग' रफीने आणलं की किशोरने? दिल पे मत ले यार!!



किशोरकुमार खराखुरा नायक झाला १९५१ साली. 'बॉम्बे टॉकिज'चा फणी मुजुमदार यांनी दिग्दर्शित केलेला 'आंदोलन' (१९५१)! सुप्रसिध्द बासरीवादक पं. पन्नालाल घोषबाबूंचं संगीत होतं. किशोर हा गायकनट तर शिवराज, सुषमा असा संच होता. याच सिनेमात मन्नादांबरोबरचं किशोरचं पहिलं ड्युएट 'सुबह की पहली किरन..' ऐकायला मिळतं. सचिनदा किशोरला व त्याच्या गायकीला ओळखून होते. त्यामुळेच या काळात एस.डी.चे त्याला बरेच चित्रपट मिळाले. १९५१ सालचे 'एक नजर', 'नौजवान', 'बहार', नवकेतनचा 'बाजी'! 'बहार' चित्रपटात राजेंद्र कृष्णने लिहिलेलं 'कसूर आपका, हुजूर आपका..' हे गाणं शमशाद व किशोर असं वेगवेगळं सोलो ऐकायला मिळतं. किशोरचं हे पहिलं 'टॅन्डम सॉंग'! (म्हणजे.. दो पहलूवाला गीत)! देव आनंद आणि किशोरदा यांनी अभिनेते म्हणून पहिल्यांदा एकत्र काम केलंय तो 'जिद्दी' (१९४८) हे आपण वाचलंत, मला 'तमाशा' (१९५२) या चित्रपटातलं गाणं आठवतंय! देव आनंद, मीना कुमारी, अशोक कुमार अशी स्टार-कास्ट होती. तर किशोरदा एका छोट्याश्या भूमिकेत होते. 'खाली पिली काहे को बोंब मारता है..' हे झकास विनोदी गाणं नक्की पहा. 'जिद्दी' (१९४८) व नंतर 'तमाशा' (१९५२) या चित्रपटात एकत्र काम केलेल्या देवसाहेब व किशोरदा यांना स्वप्नात देखील वाटलं नसेल, की आपल्यातला एक सुपरहिट अभिनेता व दुसरा एक हरहुन्नरी गायक होऊन लाखों दिलों की धडकन होणार आहे म्हणून!

लवकरच 'बाजी' (१९५१) च्या निमित्ताने किशोरदांचा 'नवकेतन'मध्ये प्रवेश झाला. 'मेरे लबों पे देखो आज ये तराने..' हे किशोरदांनी गायलेलं गाणं देवसाहेबांवर चित्रित झालं आहे. 'आशियाना' (१९५२) हा सिनेमा राज कपूर व नर्गिसचा. रफी आणि लतावर भरभरून गजलसदृश गीतांची ओंजळ रीती करणाऱ्या मदनमोहनने इथे मात्र किशोर वापरला आहे. 'ओ मॅडम दो से हम हो गये है एक..' हे गाणं मस्तच जमून आलंय. (मुख्य 'प्ले-लिस्ट' मध्ये मी 'लिंक' दिलीय.. नक्की पहा! एन्जॉय!!) १९५४ साली बिमल रॉयजींच्या 'नौकरी' या चित्रपटात किशोरकुमार, शीला रामानी, कन्हैयालाल, जगदीप, महेमूद अशी स्टारकास्ट होती. बिमलदांनी सलील चौधरीजींना संगीत देण्यासाठी अनुबंधित केलेलं. किशोरचं नाव एकीकडे गायकनट म्हणून भले गाजत होतं पण सलीलदा त्याला गायक मानायला तयारच नव्हते! त्याने गायनाचं शास्त्रोक्त असं शिक्षण न घेतल्याने हा घोळ होता, म्हणे! बिमलदांनी खूप आग्रह केला म्हणून त्यांनी किशोरला चक्क 'ऑडिशन'साठी बोलावून घेतलं. त्याचा आवाज ठीकठाक वाटल्याने शेवटी खूप जड अंतःकरणाने 'एक छोटी सी नौकरी का तलबगार..', 'ये अर्जी हमारी, ये मर्जी हमारी..' तर 'छोटासा घर होगा बादलों की छाँव में..' (सहगायिका उषा मंगेशकरजी आहेत बरं!) अशी गाणी देऊ केली. (मंडळ आपले आभारी आहे!)

खरंतर या टप्प्यावर एक गायक म्हणून किशोरदांचा आवाज.. अधिकच शारीर, मुक्त आणि स्वयंभू झाला होता. सर्व संगीतकारांनाही ते जाणवलं होतं. कोणत्याही प्रकारे शास्त्रीय संगीताची तालिम न घेता, कुणाचाही गंडा बांधून शागिर्दी न पत्करता फक्त आणि फक्त अवलोकन, अभ्यास, हाती गवसलेल्या रेकॉर्डस्चा सखोल अभ्यास आणि स्वतःच्या संकल्पनेनुसार केलेला रियाज या जमापुंजीवर एखादा नवनवोन्मेषशाली अभ्यासू कलावंत, आपलं उत्तुंग कलाशिल्प कसं उभारू शकतो, याचं किशोरकुमार हे उत्तम उदाहरण! कडक सॅल्यूट! खरं सांगायचं तर.. त्यांच्या आवाजात एक मर्दानी आक्रमकता होती. मस्तीखोर प्रियकर होता. खुशमिजाज गायकी होती. गंभीर गाण्यातही तो जीव ओतायचा. उदाहरण द्यायचं तर 'नई दिल्ली' (१९५६)! किशोरकुमार, वैजयंतीमाला अभिनीत 'नई दिल्ली'त सर्व गाण्यांची अगदी मस्त भट्टी जमून आलीय. 'मिलते ही नजर आप मेरे..', 'अरे भाई निकल के आ घर से..' ही त्या ७८आर.पी.एम. रेकॉर्डवरची मागची-पुढची गाणी. 'नखरेवाली..' या 'यॉडेलिंग" असलेल्या गाण्याने तर धुमाकुळ घातलेला. या काळात 'ॲक्टर' व 'सिंगर' या दोन्ही आघाड्यांवर त्यांचं नाव अगदी सन्मानानं घेतलं जात होतं, बरं! १९५५-६१च्या दरम्यान लाडका गायक किशोर बहरत होता. एक चलनी नाणं होतं ते!.. एक बीझी आर्टिस्ट होता तो. विविध संगीतकार दुसऱ्या नायकांच्या सिनेमात पार्श्वगायनासाठी त्याच्या नावाचा आग्रहही करायचे परंतु.. तो बहुदा उपलब्धच नसायचा. गायचं कबूल केलं तर संगीतकारांना लटकवून ठेवायचा. टांग द्यायचा, दांडी मारायचा किंव चक्का उशिरा यायचा. त्याला माज आलेला.. वगैरे काही नाही. अभिनय रक्तात भिनलेल्या कलावंताचा 'मेक-अप'च्या डबीच्या वासावर लगेच जीव जडतो. किशोरदांचंही तसंच झालेलं. संगीताच्या सुरावटींपेक्षा आपलं अभिनय कौशल्य अधिकाधिक कसं 'डेव्हलप' होईल याकडे ते त्या अमुक काळात.. जास्त लक्ष द्यायला


लागले होते. गाणं चवीपुरतीच गायची.. हा जणू त्याने मनाशी ठरवूनच टाकलं होतं की काय! खरं सांगायचं तर.. त्यामुळेच महंमद रफी हे नाव याच काळात खूप खूप नामांकित झालं, असा अनेक अभ्यासकांच्या लेखनातून दृग्गोचर होणारा मतप्रवाह आहे! स्वतः अभिनय केलेल्या सिनेमातली गाणी गाण्यासाठी तरी ते उपलब्ध असायला हवेत की नाही ? (की काही.. वेगळं कारण असेल ते परमेश्वराला माहीत..) पण त्यांच्यावर पिक्चराईज होणाऱ्या काही गाण्यांसाठी इतर संगीतकारांनी.. चक्क दुसरे 'पार्श्वगायक' वापरलेले आढळतात. जिनियस व यशस्वी 'गायक' अशी उपाधी मिरवणारा, स्वतः एक मान्यवर अभिनेता असताना.. मुख्य 'ॲक्टर', या नात्याने अभिनीत केलेल्या एखाद्या चित्रपटातील गाण्यांसाठी, इतर गायकांचा उसना आवाज घेऊन आपली गाणी करायची, हे त्यांचं एकंदर 'कॅल्क्युलेशन' मला तरी समजलेलं नाहीय! (मी या विषयी मुख्य 'प्ले-लिस्ट' मध्ये मी 'लिंक' दिल्या आहेत.. निवांतपणे नक्की पहा!!) तर.. 'भागम भाग' (१९५६) या ओ.पी. नय्यरजींनी संगीतबध्द केलेल्या सिनेमात भगवान व त्याच्यावर चित्रित झालेली 'हे बाबू ये है जमाना तेरा..' व 'छोड चले झूठी दुनिया को..' ही दोन गाणी महंमद रफी व स्वतः किशोरकुमारने गायलीत. परंतु 'दिल दिया दौलत को आँखों का..' हे दोघांवरचं गाणं महंमद रफी व एस.डी.बातीश यांनी गायलं आले. ओपीजींनी नंतर 'रागिणी' (१९५८)ची गाणी करताना किशोरची वाट न बघता 'मन मोरा बावरा..' हे शास्त्रीय थाटाचं गाणं बेधडकपणे महंमद रफीकडून गाऊन घेत किशोरकुमारवर चित्रित करायला लावलं हे तर जगजाहीर आहे. शंकर-जयकिशन एक पाऊल आणखी पुढे गेले. 'बेगुनाह' (१९५७), 'शरारत' (१९५९) तसेच 'करोडपती' (१९६१) या चित्रपटावेळी किशोर हा स्वतः उत्तम गायक असूनही त्याच्यावर चित्रित होणारी गाणी दुसऱ्या गायकांकडून गाऊन घ्यायची हिंमत शंकर-जयकिशनजींनी सुध्दा केल्याचं पाहून आश्चर्य वाटतं. त्यांनी 'अजब है दास्तां तेरी ये..' (शरारत) हे गाणे महंमद रफीच्या आवाजात केलं. किशोरदांवर चित्रित 'आप हुए मेरे बलम, मैं..' (करोडपती) तसेच 'दिन अलबेले प्यार का मौसम..' (बेगुनाह) ही दोन युगलगीतं मन्ना डे व लतादीदींच्या आवाजात आहेत. पडद्यावर किशोर पण पार्श्वगायक वेगळे. आहे की नाही गंमत ? तो शूटिंगमध्ये व्यस्त असावा म्हणून रेकॉर्डिंगला दांडी मारत असेल का ? ह्या सर्व संगीतकारांनी किशोरशी सल्लामसलत केली होती, निर्मात्यांचा आग्रह होता की कुछ अलग बात असेल ते त्या संबंधितांनाच माहीत. तर 'ॲक्टर' व 'सिंगर' किशोर बहरत होता. दुधात साखर म्हणून सी. रामचंद्रजींनी संगीत दिलेला वैजयंतीमाला, किशोरकुमार, ओमप्रकाश, प्राण अभिनीत 'आशा' (१९५७) प्रदर्शित झाला. 'इना मिना डिका..' या आशाताई व किशोर यांच्या स्वतंत्र सोलो गाण्यांनी काय विक्रम केलाय हे सांगायलाच हवं ?



आपल्या सुदैवाने.. थोडयाच अवधीत देव आनंद आणि त्याचा पार्श्वगायक किशोर हे समीकरण जनामनात चांगलंच रूजलं. १९५७ सालचंच पहा ना! नवकेतनच्या 'नौ दो ग्यारह'मधली 'आँखों में क्या जी..', 'आजा पंछी अकेला है..', 'हम है राही प्यार के..' ही गाणी चिक्कार गाजली. फिल्मिस्तानच्या 'पेईंग गेस्ट' मध्येही तेच. 'माना जनाब ने पुकारा नही..', 'छोड दो आँचल..', 'ओ निगाहें मस्ताना..', 'हाय हाय ये निगाहें..' ही गाणी लोकांनी डोक्यावर घेतली. याच सालच्या 'मिस मेरी'या मीनाकुमारी, जेमिनी गणेशन, किशोरकुमार, जमुना, ओमप्रकाश अभिनीत सिनेमात त्याला एकच एक गीत होतं. 'गाना न आया बजाना न आया..' (संगीतकार : हेमंतदा)! 'मुसाफिर' हा सिनेमा याच वर्षी आलेला. दिलीपकुमार, किशोरकुमार, सुचित्रा सेन, उषा किरण, दुर्गा खोटे, केस्टो, डेव्हीड अशी स्टारकास्ट असलेल्या या सिनेमाचं दिग्दर्शन हृषिकेश मुखर्जी यांनी केलं होतं. संगीतकार होते सलीलदा. दिलीपकुमारने स्वतःच्या आवाजात गाणं गाण्याचा हट्ट केला होता. सलीलदा थोडेसे वैतागलेले पण हृषिकेशजींनी यांना पटवून दिलीपकुमारला गायचा मौका दिला. सलीलदांनी 'लागी नाही छुटे राम..' हे गाणं दिलीपकुमार-लतादीदी असं युगलगीत म्हणून व लतादीदींचं सोलो म्हणून रेकॉर्ड केलं एकदाचं. सलीलदा आधी किशोरकुमारला गायक मानायलाच तयार नव्हते परंतु दिलीपपेक्षा हा परवडला असं वाटल्यानेच की काय, ते इथे मेहेरबान झाल्याचं दिसतं. किशोर छोट्याशाच भूमिकेत होता पण त्याने गायलेलं 'मुन्ना बडा प्यारा अम्मीका दुलारा..' आपल्या आजही स्मरणात आहे. १९५८ साल आलं ते 'चलती का नाम गाडी' घेऊन. हा सिनेमा सर्वार्थानं इतका गाजलाय की त्याच्या, कुठल्याच अंगाबद्दल लिहायची मी तरी गुस्ताखी करूच शकत नाही.. हिंमतच नाहीय यार! या चित्रपटाच्या सर्व अंगाची नशा आपल्या कानामनावर कायम असतानाच लाडक्या किशोरकुमारचा नूतन, मदन पुरी व इफ्तिखार अभिनित.. 'दिल्ली का ठग' आला. ओ माय गॉड!! संगीतकार रवींनी 'हम तो मुहब्बत करेगा..' हे सोलो तर 'ये राते ये मौसम..' व 'सी ए टी कॅट..' ही आशाबरोबरची युगलगीतं अप्रतिमरित्या कंपोज केलेली आहेत. नेहमी धीरगंभीर किंवा आशयसंपन्न शायरी लिहिणाऱ्या 'मजरूहजींचं' आपल्याला इथं वेगळंच रूप पहायला मिळतं. असो!! मागे वळून पहायचं तर.. याच दरम्यान ओपीने संगीत दिलेला किशोरकुमार-नूतनचा 'कभी अंधेरा कभी उजाला' (१९५८) नावाचा आणखी एक सिनेमा प्रदर्शित झालेला. 'सुरमा मेरा निराला, आँखों में जिसने डाला..' तुम्हाला आठवतच असेल! देवसाहेब आणि किशोरदा यांचं छान ट्यूनिंग होतं. परंतु देव आनंद (नवकेतन) कृत 'काला पानी' मध्ये किशोरदांचं एकही गाणं नसावं हे पाहून आश्चर्य वाटतं ना? कारण खरंच माहीत नाहीय! महंमद रफीने गायलेलं 'हम बेखुदी में तुमको पुकारे..' हे सोलो व 'अच्छा जी मैं हारी चलो मान जाओ ना..' हे आशाताईंबरोबरचं युगलगीत छानच होतं पण किशोरदांना एकही गाणं का बरं नसेल? मला तर वाटतं की ते नक्कीच 'चलती का नाम गाडी'मध्ये बीझी असावेत. अशोक पिक्चर्सचा 'रागिनी' याच सालातला. ओ.पी.नय्यरजींचं संगीत! 'पिया मैं हूँ पतंग तुम डोर..', 'मै बंगाली छोकरा करू प्यार को..', 'मुझको बार बार याद न आ..' ही किशोरची आशाबरोबरची युगलगीतं मस्त जमून आलेली पण किशोरवर चित्रित झालेलं 'मन मोरा बावरा..' मात्र महंमद रफी यांनी गायलंय. १९५९सालाचा आढावा घेतला तर ओमप्रकाशने दिग्दर्शित केलेला किशोरकुमार, अनिता गुहा, ओमप्रकाश, भगवान, अनुपकुमार, टुनटुन इत्यादी कलावंत असलेला 'चाचा झिंदाबाद' लक्ष वेधून घेतो. लतादीदींकडून याच सिनेमात 'बैरन निंद न आए..' सारखी बेमिसाल चीज गाऊन घेणाऱ्या मदनमोहनजींनी किशोरच्या प्रकृतीला शोभेल असं 'ऐ हसिनों नाजनीनो..' चांगलंच कंपोज केलंय. शंकर-जयकिशनजींचं संगीत असलेला रावेलसाहेबांचा 'शरारत' हा किशोरकुमार, मीनाकुमारी, राजकुमार, कुमकुम, राजेंद्रनाथ अभिनीत सिनेमा याच वर्षी आलेला. किशोरला त्यात 'हम मतवाले नौजवाँ..' हे सोलो व 'देख आसमाँ में चाँद मुस्कुराए..' हे गीता दत्तसह 'ड्युएट' होतं. 'अजब है दास्तां तेरी ये जिंदगी..' हे दोन भागातलं गाणं मात्र एस.जेंनी रफीकडून गाऊन घेतलंय. ह्या फिल्ममधलं लतादीदींनी गायलेलं 'तेरा तीर ओ बे पीर दिल के आरपार है..' आपल्या खूप आवडीचं आहे. १९६० या संपूर्ण वर्षात किशोरचं एकही उल्लेखनीय गाणं नाहीय, कारण साहेबांनी गायक आणि नायकाबरोबरच दिग्दर्शक, गीतकार, संगीतकार होण्याचं फार्फार मनावर घेतलेलं. 'झुमरू' मध्ये ते आकंठ बुडालेले. शेवटी 'झुमरू'ने १९६१ साली पडदा पाहिला. किशोर स्वतः नायक, तर सोबत होते मधुबाला, चंचल, अनुपकुमार, ललिता पवार, एम.कुमार, सज्जन, जयंत इत्यादी. दिग्दर्शक म्हणून शंकर मुखर्जींचं नाव दिसतंय पण तो केवळ कुंकवाचा धनी असावा अशी माझी मनोमन खात्री आहे. कथा, पटकथा, संवाद यावरही किशोरदांचीच हुकुमत पुरेपूर जाणवते. किशोरसारख्या मस्तीखोर-धसमुसळ्या गायकाने संगीत दिलं पण मान गए उस्ताद! मजरूहजींनी लिहिलेली 'मतवाले हम..', 'कोई हमदम ना रहा..', 'ठंडी हवा ये चाँदनी सुहानी..' त्याने मस्तच कंपोज केली आहेत.

किशोरने परिपूर्ण 'यॉडेलिंग" कसं असावं हे 'मैं हूँ झूम झूम झुमरू..' या गाण्यातून दाखवून दिलंय. किशोर नुसता सुटलाय पण त्यात अजिबात थिल्लरपणा नाहीय. 'ठंडी हवा..' तर ऐकण्यासारखं. फक्त आलापी 'यॉडेलिंग" स्टाईलची ठेवत बाकीचं गाणं विलक्षण संयमी आवाजात सादर केलं आहे. किशोरदा खरंच ग्रेट! 'यॉडेलिंग"चा विषय निघालाय म्हणून एक गोष्ट आठवतेय ती शेअर करावी म्हणतो! मुंबईत पोटापाण्याच्या निमित्ताने अष्टदिशांनी लोकांचे लोंढे येत असतात यात काही नवलाई नाहीय. (आजही येतात.) कलकत्त्यात फक्त 'गायक' हे एकच पीक घेतात का कुणास ठाऊक, पण तिथनं येणारे लोंढे हे गायकांचेच असतात. 'टोनल-क्वालिटी' कशीही असो, त्या काळात जो यायचा तो आपण किशोरच्या आवाजात गातो असं छाती फुगवत सांगायचा. किशोरच्या निधनानंतर तर धरण फुटल्यागत परिस्थिती निर्माण झाली. कारण किशोरचं अकाली निधन रसिकांच्या फारच जिव्हारी लागलं होतं. 'क्लासेस' आणि 'मासेस' सगळ्यांचाच लाडका गायक होता तो. त्याच्या गाण्याचा नुसता विषय निघाला तरी हळहळायचे लोक. 'श्रध्दांजली', 'यादें' अशा विविध कार्यक्रमांचं तर नुसतं पेव फुटलं होतं. इथले आपले गुणी कलावंत 'व्हर्शन्स' म्हणा किंवा नामवंत 'ऑर्केस्ट्रा'तून नाव कमावत होते. बीझी झाले होते. 'गायकाचा' पेशा-व्यवसाय म्हणजे 'आरामाचं काम व दाबून कमाई' असा झॅक असल्याने एखादा 'ऑर्केस्ट्रा' म्हणा किंवा कमसे-कम 'बियर बार' मधल्या ग्रुपमध्ये तरी आपली वर्णी लागावी या आशेने थेट कलकत्त्यातून किंवा चक्क बांगला देशाच्या सरहद्दीवरून 'व्हाईस ऑफ किशोर' म्हणून अनेक नवथर गायकांचे लोंढे येऊ लागले होते. रात्री हॉटेलात वा तत्सम कार्यक्रम संपला की ही मंडळी दिवसभर मोकळीच असत. दिवसभर माशा तरी किती मारणार म्हणून हे लोक एकेक करत सगळ्या म्युझिक कंपन्यांना भेट देत असत. स्वागतकक्षात रीघ लागायची. ती वरात भोज्या-भोज्या खेळत नंतर आमच्याकडेही यायची. माझ्या डोक्याला हा नवीन ताप झालेला. का? तर 'बॉस' ती झंझट माझ्याकडे पाठवत असत. (मला खुन्नस यायचा. च्यायला! काम असलंच तर इथे मराठी 'टॅलेन्टेड' पोरं काय कमी आहेत? त्यांना काम द्यायचं तर त्यांच्या मुखातला घास काढून तुला देऊ? का? तू कुणाचा वशिला आणलायस? किशोरदांचा जातभाई आहेस किंवा त्यांच्या गावचा म्हणून? अरे हटाव यार!.. एखाद्या 'टॉर्चर-रूम' मध्ये नेऊन फटके द्यायचं खूप मनात यायचं.) 'मैं किशोरकुमार की आवाज में गाता हूँ. मुझे एक मौका दो.. मार्केट में आग लगा दूँगा..' असं छातीठोकपणे सांगत. त्यांना एंटरटेन नाही केलं तर एखादा माथेफिरू ऑफिसला खरोखरच आग लावेल म्हणून झक मारत भेटावं लागत असे. 'हाय-हॅल्लो' झाल्यावर मी त्यांना एखादं गाणं म्हणायला सांगत असे. तो उत्साहाने दोन-तीन गाणी म्हणून दाखवायचा. किशोरची पाच-दहा टक्के तरी 'व्हाईस क्वालिटी' मिळेल तर शपथ! पण तोंडावर कसं सांगणार? मी शांतपणे 'मैं हूँ झुमरू.. म्हणून दाखव बघू!' असं निर्वाणीचं अस्त्र उपसायचो. मग काय विचारता! अस्त्र नाही की शस्त्र! 'सुदर्शन चक्र' ठरायचं ते. पुढच्या पाचेक मिनिटात समोरचा उम्मीदवार 'धोबीपछाड'! त्याच्या हातात नारळ दिला की मोकळे. किशोर तो किशोर! त्याच्या गाण्यात, त्याने केलेलं 'यॉडेलिंग" दुसऱ्या कोणत्याही गळ्यातून ऐकवत नाही यार!





'झुमरू'(१९६१) च्या यशाने किशोरमधले गुण आपोआपच सिध्द झाले. यामुळे मात्र एक वाईट झालं. लोक किशोरला आदराने हरफनमौला (सर्वगुणसंपन्न!) म्हणू लागले व किशोर 'कॉलर' टाईट करून फिरायला लागला. कलाकृतीला एखादं 'अॅवॉर्ड' मिळालं ना की कलावंताला कृतकृत्य झाल्यासारखं वाटतं. 'फिल्मफेअर' मिळेल अशा आशेवर होता तो. (उत्कृष्ट अभिनेता म्हणून याचं नाव या यादीच कधीच झळकलं नाही व गायक म्हणून किशोरच्या हातात 'फिल्मफेअर'ची बाहुली १९६९साली आराधनामुळे आली! त्याला गायक म्हणून सर्वात जास्त, म्हणजे आठ 'ट्रॉफिज' मिळाल्यात. तो १९७१ ते १९८४ या सर्वच वर्षी एखाद-दुसरा अपवाद वगळता वीस वेळा नामांकन यादीत होताच होता. असो!) पण हाय रे किस्मत! तिथं तगडी स्पर्धा होती. त्यात 'झुमरू' कुठेच नव्हता तरीही लोकांचं कौतुक काही कमी होत नव्हतं. काही जण तोंडावर तारीफ करायचे व मागून तिरसट म्हणायचे (उगाचच) लोक त्याला. परंतु खरोखरच 'ब्रिलियन्ट' होता तो. 'मैं सिर्फ गायक नही, नायक हूँ, संगीतकार भी हूँ..' किशोरने नंतर पार्श्वगायनाची कामं स्वतःच सोडली. अपवाद फक्त नवकेतन, एस.डी. व मेहमूदचा. 'हाफ तिकिट', 'मनमौजी', 'रंगोली' हे अनुक्रमे सलील चौधरी, मदनमोहन, शंकर-जयकिशनचे १९६२ सालचे चित्रपट गाजले. 'दूर गगन की छाँव में', 'मिस्टर एक्स इन बॉम्बे', महमूद निर्मित 'भूतबंगला' तसेच 'गंगा की लहरें', 'हम सब उस्ताद है', 'तीन देवियाँ', 'प्यार किए जा', 'अभिलाषा', 'दो दुनी चार', 'पडोसन', 'ज्वेल थिफ' असे किशोरची गाणी असलेले सिनेमे गाजले. पण एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी की 'दिल तेरा दीवाना', 'प्रोफेसर', 'संगम', 'मिलन', 'उपकार', 'शिकार', 'दोस्ती', 'सूरज', 'हरियाली और रास्ता', 'चायना टाऊन' तर देव आनंदचा 'असली नकली' असले संगीताबाबतीत बावनकशी चित्रपट असूनही किशोर मात्र त्यात नव्हताच. पार्श्वगायन करण्यात त्याला इंटरेस्टच नव्हता जणू. कल्याणजी-आनंदजींची मुलाखत घ्यायला गेलेलो तेव्हा कल्याणजीभाई म्हणाले की, मी त्याला 'उपकार'(१९६७) चित्रपटातलं 'कसमे वादे प्यार वफा सब..' गाणार का? असं विचारलेलं. गाण्याची प्रकृती, चाल, मूड सर्व काही त्याच्या आवाजाला सूट होईल असं होतं.. पण त्याने नम्रपणे नकार कळवलेला.' या काळात खरंतर किशोर लहरी झाला होता. दोन दगडांवर पाय नको असं म्हणायचा. मी 'अॅक्टर' किशोरच ठीक आहे. वर्षाभरात 'सुहाग रात' (१९६८) या जितेंद्र अभिनीत चित्रपटात मात्र एक 'भजन सदृश' गाणं गाण्याचं कबूल केलं त्याने. कल्याणजी-आनंदजींकडे त्याचं हे पहिलंच गाणं. ओळख होती, ऋणानुबंधही होते पण एकत्र काम करण्याचा योग नव्हता आला. किशोर आयुष्यात प्रथमच 'भजन' स्टाईलचं गाणं गाणार होता. 'फेमस'ला सगळे जमले. किशोर 'इडलीओऊ' करतच आला. 'भजन' गायचंय यार! 'टोपी' पाहिजे! दिली आणून. जाकीट हो तो और मजा आता था! दिलं आणून. 'भजन' गायचंय.. मस्त माहौल बनला पाहिजे! तुम्हाला हे नखरे वाटले असतील ना? नाही! कल्याणजी-आनंदजींच्या दोस्ती-यारीमुळे आग्रह होते ते. आणि 'धरती की तरहा हर दुःख सह ले..' हे 'भजन सदृश' गाणं रेकॉर्ड झालं..' रसिकांनो.. तसं पहायला गेलं तर किशोरदांचं हे एकमेव 'भजन सदृश' गीत नाहीय बरं!. आपल्याला 'हे रे कन्हैया..' (छोटी बहू-१९७१), 'आओ कन्हाई मेरे धाम..' (मेरे जीवन साथी-१९७२), 'काहे अपनों के काम..' (रामपूर का लक्ष्मण-१९७२), 'कृष्णा कृष्णा बोलो..' (नया दिन नयी रात-१९७४), 'जय भोलेनाथ जय हो प्रभू..' (कुंवारा बाप-१९७४), 'मूर्ती गणेश की..' (टक्कर-१९८०), 'तरस गयी रे तरस..' (जोरू का गुलाम - १९७२) अशी अनेक गाणी बसल्या बैठकीत आठवतात, की नाही!. मात्र मला.. माझ्या आवडीचं किशोरदांचं 'भक्तिरसपूर्ण' गाणं विचारलंत.. तर मी 'जब राम नाम ले ले..' (अभी तो जी ले - १९७७) असं मनापासून सांगेन. बाय द वे! त्यांची.. 'गुणीजनों भक्तजनों..' (आंसू और मुस्कान-१९७०), 'प्रिये प्राणेश्वरी, हृदयेश्वरी..' (हम तुम और वो-१९७१), 'देखो ओ दीवानों, तुम..' (हरे राम हरे कृष्ण-१९७१), 'भोले ओ भोले..' (याराना-१९८१), 'बन्सी बजाओ..' (जुदाई-१९८०), 'मेरे भोले बलम..' (पडोसन-१९६८)! ही भक्तिगीतं तर अजिबात नाहीत पण ती 'भजनी ठेक्यात' सजवलेली आहेत, इतकंच!

१९६८ सालातलं किशोरचं गायक म्हणून योगदान पाहिलं तर त्याने पार्श्वगायक म्हणून हाताच्या बोटावरही मोजता येणार नाहीत इतके कमी सिनेमे केलेत. 'प्यार हुआ है जबसे, मुझको नही चैन आता..' (संगीत : आर.डी.बर्मन) हे लतासह गायलेलं 'अभिलाषा' मधलं युगलगीत, देव आनंद नायक असलेल्या 'दुनिया' मधलं 'दूरीयाँ नजदीकियाँ बन गयी..' (संगीत : शंकर-जयकिशन) हे आशासह गायलेलं युगलगीत. 'दो दुनी चार'चा तर तो स्वतःच नायक होता. 'हवाओं पे लिख दो हवाओं के नाम..' अतिशय सुरेख गायलाय तो. 'पडोसन' (संगीत : आर.डी.बर्मन) बद्दल काय सांगावं?

किशोरकुमार तर महत्त्वाचा हिस्सा होते. 'मेरे सामनेवाली खिडकी में..', 'कहना है आज तुमसे ये पहली बार..', 'मेरी प्यारी बिंदू..' ही सोलोज तर 'एक चतुरनार करके सिंगार..' ही मन्नादा व मेहमूदसोबतची जुगलबंदी झकासच जमलेली. पंचमदांसकट सगळेच संगीतकार त्याला पार्श्वगायन कर, पार्श्वगायन कर असं सतत सांगायचे. तो दुर्लक्ष करायचा. किशोरनं एकमेव 'भजन' गायलं म्हणून त्याच्या विचारधारेत परिवर्तन झालं, असा सूर आळवला होता काही लोकांनी. खरंतर चाळीशीत पदार्पण केल्याने हीरोच्या भूमिका मिळायचे चान्सेस कमी झाल्याने त्याने पार्श्वगायनाकडे वळायचा निर्णय घेतला असावा, असं वाटतं खरं! 'साधू और शैतान' या १९६८ च्या विनोदी चित्रपटात आपले किशोरदा अभिनेता म्हणून होते, परंतु त्यांना यात एकही गाणं नव्हतं. 'बॉंबे टू गोवा' (१९७२) मध्ये किशोरदा छोटयाश्या भूमिकेत होते. एक गाणंही होतं. अमिताभसाठी पार्श्वगायन केलं, हे विशेष!

'आनंद' सिनेमाबद्दल एक आठवण सांगितली जाते. 'रूपम' चित्रचा हा सिनेमा! हृषिकेश मुखर्जी दिग्दर्शक होते. १९६९साली या सिनेमाची रूपरेषा आखताना तो कॉमेडी करावा असं निर्मात्यांच्या मनात बिल्कुल नसावं पण नायक म्हणून डोळ्यांसमोर होता तो गायक-अभिनेता किशोरकुमार. सहनायक म्हणून मेहमूदला घ्यायचं असंही ठरलेलं. हृषिदा किशोरच्या भेटीसाठी त्याच्या घरी गेले. गेटकिपरने त्यांना चक्क हाकलून काढलं. झालेलं काय तर कुठल्यातरी एका 'बंगाली' निर्मात्यानं 'लाईव्ह-शो' आयोजित केलेला. कार्यक्रमाचं समाधानकारक सादरीकरण होऊनही किशोरदांचे पैसे रखडवले होते. किशोरदा स्वतः बंगालीबाबू. पण गेटकिपरला त्यांनी बजावून सांगितलेलं.. 'कोई बंगालीबाबू आया तो उसकी एक ना सुनना.. सीधा भगा देना..' हृषिदा आपल्या उंबरठ्यापर्यंत येऊन गेले व त्यांचा गैरसमजामुळे हा असा अपमान झाला हे किशोरदांना कळलंच नाही. हृषिदांनी दुःखी होऊन आपली ती 'आईडियेची कल्पना' बासनात गुंडाळली.. आणि तसे नवखेच असलेल्या राजेश खन्ना, अमिताभला घेऊन 'आनंद' पूर्ण केला. किशोरदा कुणाशी कधी कसे वागतील याचा कधीच कुणाला अंदाज येत नसे. एखाद्या गाण्यातली लकब असो की इंप्रोवाईजेशन. सहगायक किंवा सहगायिका भांबावून गेलेच म्हणून समजा. गीतकार-संगीतकाराकडे नम्रपणाचा बर्ताव असायचा परंतु निर्माता-दिग्दर्शकाबरोबर सुतासारखे सरळ वागतीलच याची खात्री नसायची. किशोरसाहेब कधी कधी टोकाची भूमिका घ्यायचे. खरंतर हा त्यांचा विक्षिप्तपणा नव्हता. कुणी फसवलेलं त्यांना अजिबात सहन होत नसे. सिनेमे प्रोड्यूस करताना अशा अनेक फसवणूकींना सामोरं जावं लागतं म्हणून हात पोळलेले लोक ताक सुध्दा फुंकून पितात. म्हणूनच ते पैशांसाठी नेहमीच आग्रही असायचे. त्यांचा एक किस्सा चवीने सांगितला जातो. ते नेहमी ज्या निर्मात्याबरोबर काम करत त्याने एकदा सांगितलेलं की, 'तू उद्या गाणं रेकॉर्ड कर, मी पैसे नंतर देईन.. आज बँका बंद आहेत माहीत आहे ना?..' दुसऱ्या दिवशी रेकॉर्डिंग होतं. रेकॉर्डिंग करण्यापूर्वी किशोरदांनी पैशांची मागणी केली. प्रोड्यूसर म्हणाला.. 'आपला माणूस पैसे आणायलाच बँकेत गेलाय.. तो येईपर्यंत रेकॉर्डिंग कर की!..' किशोरदा टॉयलेटच्या निमित्ताने वॉशरूममध्ये गेले, आतून कडी लावली. टॉयलेटच्या खिडकीच्या काचा काढल्या. तिथून बाहेर रस्त्यावर उडी मारली आणि शांतपणे आपल्या गाडीत बसून घरी निघून गेले. इतर रेकॉर्डिंग स्टुडिओतही तीच गत. आपलं गाण्याचं मानधन मिळेपर्यंत ते माईकवर रिहर्सल्स करत रहायचे. सहायक म्हणा की ड्राईव्हर असलेला अब्दुल नामक बंदा, चहा घेऊन आला की पैसे मिळाल्याचा सिग्नल मिळायचा. खुशीखुशीत किशोरदा मग 'ओके' टेक द्यायचे. एकदा ते असेच रिहर्सल्स करत राहिले होते पण बराच वेळ झाला तरी चहा काही येईना. शेवटी त्यांनी अब्दुलभाईला सांगावा धाडला. अब्दुलने आत येत सांगितलं...'दादा.. आज चाय नहीं आएगी. अपनीच बॅनरका गाना है!..' किशोरदा वैतागले.. 'उल्लू के पठ्ठे!.. पहले बोलनेका नही क्या?..' गाणं रेकॉर्ड केलं एकदाचं. हे किस्से बुजुर्ग वादकांनी सांगितलेत हं! खरं-खोटं देव जाणे पण किशोरदांच्या 'हाफ टिकीट' (१९६२)बद्दलचा एक किस्सा बुजुर्ग सिनेपत्रकार सांगत असतात. या सिनेमात लतादीदींबरोबर ('चॉंद रात तुम हो साथ..' इत्यादी) त्यांची तीनेक युगलगीतं होती हे आपण जाणताच. असं म्हणतात की 'आके सीधी लगी जैसे दिल पे कटरिया..' या युगलगीताच्या रेकॉर्डिंगच्या वेळी लतादीदी काही कारणास्तव येऊ शकल्या नाहीत, म्हणून त्यांनी पुरुष पात्र व स्त्री पात्रांसाठी स्वतःचाच आवाज वापरला!ए

'आराधना' या किशोरदांसाठी 'माईल-स्टोन' ठरलेल्या पिक्चरची आठवणही सांगण्यासारखी आहे. १९६८च्या दरम्यान एस. डी. बर्मनजींना शक्तिदांचा 'आराधना' मिळाला होता. सचिनदा नव्या जोमानं कामाला लागले होते. या

काळापर्यंत सचिनदांचा सांगीतिक प्रवास तसा व्यवस्थित सुरू होता परंतु आता तब्येतीच्या तक्रारी मधनं-मधनं डोकं वर काढत होत्या. 'आराधना'चा हीरो राजेश खन्ना ! महंमद रफी-लतादीदींच्या आवाजातली 'बागो में बहार है..' आणि 'गुनगुना रहे है भँवरे..' रेकॉर्ड झाली होती पण दुर्दैवाने सचिनदा पुन्हा एकदा अचानक आजारी पडले. पंचमदांनी सूत्रे आपल्या हाती घेतली. याबाबतीत अशी माहिती मिळाली की सर्व धून तयार होत्या पण महंमद रफी उपलब्ध होण्यात अडचण येत होती. ते म्हणे याच काळात हाज यात्रेला गेले होते. एकीकडे आपलं वाढतं वय व काही सिनेमे फ्लॉप झाल्याने किशोरच्या डोक्यावरचं ॲक्टिंगचं भूत उतरत होतं. तो सचिनदा-पंचमदांच्या सतत संपर्कात असायचाच. देव आनंदला फिट्ट बसलेला किशोरचा आवाज मग पंचमदांनी राजेश खन्नाला वापरायचं ठरवलं. 'मेरे सपनों की रानी कब..' व 'रूप तेरा मस्ताना..' ही दोन गाणी पंचमदांनी जीव ओतून केली. किशोरही चांगलाच गायला. लक्षात घ्या रफीसाहेबांनीही त्यातली काही गाणी गायलेली पण योगायोग असा घडला की पुढे किशोरकुमार हाच राजेश खन्नाचा 'आवाज' म्हणून लोकमान्यता मिळाली. किशोर पार्श्वगायक म्हणून कधी नव्हे इतका गाजला. सर्वत्र तारीफ ही तारीफ ! 'आराधना' (१९६९ साली प्रदर्शित) मुळे तो कुठल्या बुलंदीवर पोहोचला ते आपण सर्वांनीच अनुभवलंय. 'आराधना' नंतर 'गायक किशोर'ने, 'ॲक्टर किशोर'ची तलवार म्यान करून टाकली. नंतर काही दिवसातच 'दो रास्ते', 'महल', 'आन मिलो सजना', 'आँसू और मुस्कान', 'घर घर की कहानी', 'हमजोली', 'जॉनी मेरा नाम', 'कटी पतंग', 'पवित्र पापी', 'रूठा न करो', 'सच्चा झूठा', 'सफर', 'उमंग', 'खामोशी', 'इम्तीहान' अशा कित्येक सिनेमांमध्ये पार्श्वगायनाच्या ऑफर्स आल्या. किशोरने त्या स्वीकारत मन लावून काम केलं. आपल्या या भन्नाट घोडदौडीनं त्याने चलती असलेल्या महंमद रफींना तसेच आपले पाय रोवून अमुक गाणी मिळवणाऱ्या मन्नादांना जबरदस्त चॅलेन्ज निर्माण केलं व तात्पुरतं का होईना पण मोडीत काढलं. काही कठीण वाटणाऱ्या गाण्यांसाठी महंमद रफीला पाचारण केलं जाई यात वाद नाही पण बाकी सबकुछ 'किशोर' ! तो देव आनंदचा आवाज होताच नंतर तो राजेश खन्नाचा आवाज झाला. किशोरला राजेश खन्नाच्या पायगुणामुळे प्रसिध्दी मिळाली की राजेश खन्नाला किशोरमुळे, हा वाद अलाहिदा पण राजेश खन्नाला 'सुपरस्टार' म्हणून नामाभिधान मिळण्यात किशोरचं सुध्दा योगदान आहे हे तो प्रांजळपणे कबूल करत असे. योगायोगाने राजेश खन्नाची सद्दी संपून अमिताभ या महानायकाचं युग अवतरताच किशोरकुमार हा त्याचा आवाज झाला. संगीताचं 'सुवर्ण-युग' संपून पंधरा वर्षे उलटली आहेत असं बुजुर्ग सांगत असतील. त्यात तथ्यही आहे पण या काळातली गाणी सुध्दा गाजत होती हे आत्ता साठीत असलेल्या माझ्या पिढीने तरी पुरेपूर अनुभवलंय. आमच्या ती आवडती होती हे सत्य का म्हणून नाकारायचं ?




आपल्या किशोरदांनी भारतातील अनेक भाषांमध्ये गाणी गायली आहेत. यामध्ये हिंदी बरोबरच मराठी, गुजराती, बंगाली, आसामी, कन्नड, भोजपुरी, मल्याळम अशा विविध भाषेतील गाण्यांचा समावेश होतो. 'अश्विनी ये ना!..' हे किशोरदांचं पहिलं मराठी गाणं आपण कधीच विसरू शकत नाही! मात्र, हे गाणं गायला किशोरदांनी ठाम नकार दिलेला. आपल्या मराठी भाषेतले 'च', 'ष', 'ळ', 'ज' आणि 'झ' तसेच 'ज्ञ', 'क्ष' याचे खास असे उच्चार आहेत, आणि हिंदी भाषिक गायकांसाठी ते अक्षरशः कठीण आहेत. (महंमद रफी, तलत महमूदसाहेब यांचाही हाच प्रॉब्लेम होता बरं! पण हेमंतदा ग्रेट!) या गाण्याचा खुमासदार किस्सा निर्माता/दिग्दर्शक असलेल्या सचिन पिळगांवकर याने जाहीरपणे सांगितलेला. किशोरदांचा 'नकार' हा 'होकारामध्ये' कसा बदलायचा बरं ?!! तर.. या मराठी गाण्याचा प्रस्ताव घेऊन 'सचिन' स्वतः किशोरदांना 'रुबरू' भेटला. किशोरदा नकार देत म्हणाले.. 'अरे भाई.. तुमच्या प्रत्येक मराठी गाण्यात खूप कठीण शब्द असतात..!' सचिनच्या लक्षात आलंच असणार की किशोरदा.. त्या 'टिपिकल' अशा 'ळ' उच्चाराविषयीच बोलत असणार! (पण मला एक समजत नाही.. सचिन किशोरदांबरोबरच्या चर्चेत त्या गप्पांमध्ये काही उघडपणे बोलला असेल की नाही? कुणास ठाऊक! पण 'अरे रफ्ता रफ्ता देखो आँख मेरी..' या 'कहानी किस्मत की' (१९७३) या सिनेमातील गाण्याचा शेवट करताना.. मुळचे गिरगावकर असलेल्या.. (आणि मराठी भाषेशी पूर्णतः एकरूप असलेल्या..) आपल्या संगीतकार 'कल्याणजी-आनंदजी' साहेबांनी.. 'काल रातीला सपान पडलं..' या गाण्याच्या 'ये जवळ ये लाजू नको..' (एकटा जीव सदाशीव (१९७२) या ओळी किशोरदांकडून.. या गाण्यात तंतोतंत गाऊन घेतल्या होत्याच ना! मग काय प्रॉब्लेम होता?) माहीत नाही! (आपला सचिन स्वतः एक उत्तम गायक आहे, बरं!) सचिनने स्पष्टपणे सांगितलं... या गाण्यात 'च', 'ष' आणि 'ळ' नसतील. मग काय! किशोरदा तयार झाले. ज्येष्ठ कवि, गीतकार शांतारामजी नांदगांवकर ( आमचे 'डॅडी'!) यांच्या कडून त्याबरहुकुम गाणं लिहून घेण्यात आलं. किशोरदा खूष! 'मेहबूब' स्टुडिओत ते रेकॉर्ड करण्यात आलं. 'अश्विनी ये ना!..' हे गाणं अभिनेते 'अशोक सराफ आणि चारूशिला साबळे' वा चित्रित करण्या आलं. नंतर हुरूप येताच 'गोरा गोरा मुखडा..' (घोळात घोळ-१९८८) आणि 'तुझी माझी जोडी जमली गं..' (माझा पती करोडपती-१९८८) अशी आणखी दोन गाणी, मराठी चित्रपटांसाठी गायली. हा सिलसिला असाच सुरू राहिलाही असता.. पण हाय रे आपली किस्मत! आपल्या लाडक्या किशोरदांचे मंगळवार दि. १३ ऑक्टोबर, १९८७ राजी (तेही त्यांचे ज्येष्ठ बंधू दादामुनी (अशोककुमारजी) यांच्या वाढदिवशीच अखेरचा श्वास घेतला होता!) ही बोंच मात्र कायम राहणारेय!

आनंदजींनी किशोरदांच्या खूप आठवणी सांगितल्या.. 'अमुक गाणी गाताना त्याच्यातला कसलेला अभिनेता अचानक जागा होई. 'खई के पान बनारसवाला..' (डॉन)च्या वेळी दोन पानं खाऊन गाण्याच्या बोलाची प्रॅक्टिस केली आणि नंतरच त्याने ते सादर केलं. इतका बारीक तपशीलवार अभ्यास करणारा हा एकच गायक. 'मेरी प्यारी बहनिया..' चा किस्सा तर वेगळाच आहे. लग्नाच्या वरातीचं सिच्युएशन होतं. इंदिवरजींनी गाणं दिलेलं करून. या गाण्यात इतर गाण्यांसारखं व्हायोलीन किंवा ब्रास सेक्शन नको होतं. लाईव्ह बॅण्ड हवा होता. आम्ही वरातीतल्या बॅण्डसारखा परफेक्ट इफेक्ट साधावा म्हणून मुगभाटातले बॅण्डवाले बोलावलेले. दुसऱ्या दिवशी 'टेक' होता पण पावसाला सुरुवात झाली. थांबेचना. दुपारपर्यंत फिल्म-सेंटरजवळ कंबरभर पाणी तुंबलंय म्हणून रेकॉर्डिंग कॅन्सल करूया का, असं आम्ही किशोरदांना विचारलं. उसळलेच ते. 'तुम लोग ना कहते हो तो आज मैं रेकॉर्डिंग करकेही रहुँगा!..' आमचे धाबे दणाणले. थोडं उशिरा यायला सांगून आम्ही कामाला लागलो. लाईव्ह बॅण्डवाल्यांच्या वादनाची पध्दत थोडीशी वेगळी असते. ते गाणं आमच्यासारखं 'बार ॲण्ड बीटस्'वर उचलत नाहीत. त्यांचं ते 'वन-टू' देणंच अलग असतं. आमच्या रेग्युलर वादकांनी एकेक आघाडी सांभाळली पण त्यांच्याशी जुळवून घेताघेताच आम्हां सगळ्यांचाच घामटा निघाला. तगड्या रिहर्सल्स होताच किशोरदा माईकवर आले. मग काय विचारता राव! बॅण्डवाल्यांच्या लाईव्ह तालासुरात रेकॉर्डिंग पार पडलं. किशोरदाही समरसून गायले..'

किशोरने आपल्या गायकीतून मानवी भावभावनांचे सगळेच कंगोरे व्यक्त केल्याचं जाणवतं. संयम, आक्रमकता, हळुवारपणा, संवेदनशीलता, मस्ती, समर्पण, विरह, हळवेपण अशा मानवी मनाच्या जितक्या अवस्था म्हणाल त्या सगळ्याच अवस्था त्याच्या गाण्यांतून समर्थपणे दृग्गोचर होताना दिसतात. रियाजी आवाज नसूनही त्याच्या आवाजाची धार-झार (काय म्हणाल ते!) सणसणीत अशीच होती. त्यात पुरुषी आवाजाचे सगळे गुण होते. त्याने गायलेल्या गाण्यांवर त्याचा कोरीव ठसा

आहे हे कुणीच नाकारू शकत नाही. त्याने स्वमेहनतीने आपली स्वतःची जी शैली विकसित केली त्याला तोड नाही. ती अत्यंत 'फॅन्टॅस्टिक' अशीच आहे. किशोरदांनी गायलेल्या गाण्यांचा आवाका प्रथमदर्शनी इतका प्रचंड वाटतो की आपल्या कारकिर्दीत त्यांनी वीस-पंचवीस हजार गाणी सहज गायली असतील. किशोरदांची १९४८ ते १९८७ म्हणजे सुमारे ३९ वर्षांची कारकीर्द अभ्यासणाऱ्यांच्या मते आणि उपलब्ध माहितीनुसार त्यांनी गायिलेली एकूण गाणी २९०५. त्यातली ११३५ ही सोलो. ६८९ ही सर्वाधिक व्द्वंदगीते ही आशाताईंबरोबर आहेत तर त्यांचं ५८८ गाण्यांसाठीचं पार्श्वगायन हे एकट्या पंचमदांकडे आहे. त्यांनी एकूण ९३ चित्रपटात अभिनय केला होता तसेच सुमारे २० चित्रपटांची निर्मिती केली होती. (नऊ सिनेमे अर्धवट राहिलेत!) त्यांचं पहिलं कथालेखन आणि दिग्दर्शन हे 'दूर गगन की छाँव में' (१९६४)साठी असल्याचं म्हटलं जातं खरं पण या सिनेमाची निर्मिती, कथा, दिग्दर्शन, संगीत तसेच एका गाण्यासाठी गीतलेखन ('आ चल के तुझे..') किशोरदांचं होतं.

शास्त्रीय संगीत कुणाकडेही न शिकता वा कुणाची शागीर्दी न करताही किशोरने गायलेल्या गाण्यामधून त्याचं अष्टपैलूत्वच पहायला मिळालं. मग त्याच्या स्वराला अस्सल 'शास्त्रीय संगीत' वर्ज्य होतं का? असं जर असेल तर 'पायलवाली देखना..' (एक राज - १९६३) हे मारूबिहाग रागातलं गाणं कसं काय गाऊ शकला? किराणा घराण्याचं वैशिष्ट्य असलेला हा राग, संगीतकार चित्रगुप्तजींनी ज्या पध्दतीने मांडला आहे त्याला किशोरदांनी पूर्णपणे न्याय दिलेला आढळून येतो. याच नाण्याची दुसरी बाजू बघायची तर 'सलाम-ए-इष्क मेरी जाँ..' गाण्याच्या कडव्याला आलाप आहे म्हणून गडबडून गेलेले किशोरदा. मन्नादांना बोलवा म्हणाले, परंतु आनंदजींनी त्याला तो आलाप कसा हवा ते सांगत त्याच्या कलाकलाने घेत, शिकवून मगच रेकॉर्डिंग केलं. किशोरने ती पेशकश चक्क अमिताभच्याच आवाजात केली आहे. 'पग घुँगरू बाँध मीरा नाची थी..' (नमक हलाल) च्या वेळी मात्र वेगळंच घडलं. संगीतकार होते भप्पीदा! आपले मराठमोळे अनिल-अरूण त्यांचे संगीत-संयोजक होते. 'डिस्को-कव्वाली' प्रकारातल्या या गाण्यात अशी फोडणी हवीच असते म्हणून पहिल्या अंतऱ्यानंतर काहीतरी गिमिक करायची लहर आली होती. त्यांनी सुपरहिट झालेल्या 'ओसिबिसा' अल्बम मधल्या 'ओजा अवेक' या गाण्यातला भाग 'सरगम' म्हणून वापरायचं ठरवलं. किशोरदांचा अनुभव पाहता ती खूप कठीण होती असंही नाही.. पण दुदैवाने अनेक रिहर्सल्स करूनही ती जमेचना. 'पनीसा-मपनी-रेरेरेरे-रेगरेग४' नंतर येणारा 'पपपप-पमगरेसानीसा..' असा धबधबा किशोरदांना गाणं मुश्किल झालं. शेवटी हा छोटासा पोर्शन.. पं. सत्यनारायण मिश्रा या संगीत-सहायकाने (हे साहेब कल्याणजीभाईंच्याच कॅम्पमधले बरं का!) गाऊन त्या जागी जोडकाम केलं गेलं. (सोबत 'लोंक्स दिल्या आहेत) युगलगीतं गाताना किशोरदा सोबत कुणीही असो त्याच्याशी काही वेळ जमवून घ्यायचे पण एका अमुक जागी आपलं अस्त्र उपसून एखादी मस्त जागा घेऊन त्या सहगायकावर कुरघोडी करायचे हे त्यांची अनेक गाणी ऐकताना जाणवतं. साथीला मन्नादा असले की किशोरदा खूष असायचे. 'एक चतुरनार..' हे एकच उदाहरण पुरेय! . लतादीदी व आशाताई या प्रगल्भ स्वरदेवतांबरोबर मात्र ते अधिकच खुलताना दिसायचे. इथे शास्त्रीय संगीतावर आधारित एका गाण्याची आठवण सांगायची तर.. 'भोर आयी गया अंधियारा..' (बावर्ची-१९७२) हे मदनमोहनजींच्या संगीतातलं गंमतीदार गाणं आठवतं. किशोरदा, मन्नादा, निर्मला देवी, हरिंद्रनाथ चट्टोपाध्याय, लक्ष्मी शंकर यांच्या आवाजात आहे ते! सुरुवात शास्त्रीय स्टाईलने होते खरी पण पुढे त्याचं विनोदी अंगाने जे धम्माल फ्यूजन होतं, की बस्स रे बस्स!





किशोरदांबद्दल किती सांगावं? अभिनेता, पार्श्वगायक, गीतकार, संगीतकार, दिग्दर्शक, स्टेज-परफॉर्मर अशा चतुरस्त्र गुणांनी संपन्न, असं हे बहुआयामी व्यक्तिमत्व. एकीकडे त्यांचा स्वभाव हट्टी, आग्रही होता असं म्हणणारे सुद्धा त्यांच्या स्वभावात हळवेपणासह अनेक लोभस पैलू आणि अचंबित करणारे कंगोरे होते, असं आपलेपणाने सांगतात. त्यांच्या गाण्यांची जादू कधीच संपणारी नाही. ती अक्षय्य आहे. अनेक पुस्तके लिहिली गेली आहेत त्यांच्यावर. मात्र, त्यांची ठळक ओळख, मात्र त्याबरोबरच या हरहुन्नरी कलंदर कलाकाराच्या समग्र, अलौकिक वाटाव्या अशा संपूर्ण आयुष्याचा.. ज्येष्ठ संगीत-संशोधक/अभ्यासक 'अनिरूद्ध भट्टाचार्यजी' आणि व ज्येष्ठ लेखक 'पार्थिव धर' यांनी 'किशोर कुमार - दि अल्टिमेट बायोग्राफी' या हल्लीच प्रकाशित झालेल्या (२०२२ साली) त्यांच्या पुस्तकात वेध घेतला आहे. (पुस्तकाची लिंक : **https://g.co/kgs/UzTctnW** ) या लेखकद्वयीने सुमारे तीन दशके केलेल्या अथक सखोल संशोधनाची फलनिष्पत्ती म्हणजे हे पुस्तक.

या पुस्तकातील उल्लेखानुसार.. ''मध्य प्रदेशातील खांडवा येथे किशोरकुमार यांचे गेलेले बालपण, त्या गावाशी असलेला अतूट स्नेहबंध, संगीताची उपजत आवड, महाविद्यालयात असताना शिक्षणापेक्षा गाण्यातच असणारे स्वारस्य, दुबे नावाच्या प्राध्यापकाने 'गाने बजाने से जीवन नहींइ चलेगा..' असा सल्ला दिल्यावर.. 'सर, मैं इसी में अपना करिअर बनाऊंगा..' असे दिलेले उत्तर, शास्त्रीय संगीत शिकण्याची परवानगी घरातून मिळण्याची शक्यता नसूनही, चित्रपट आणि गाण्यांच्या क्षेत्रातच जाण्याची उर्मी, त्यातून मुंबईला जाण्याचा निर्णय, मुकेश, मन्ना डे असे गायक असताना किशोरला सुरूवातीस हिंदी चित्रपटसृष्टीत मिळालेला नकार..''.. असा सारा विस्तृत पट या लेखकद्वयीने उभा केला आहे. अनेक गाण्यांमागील कहाण्याही वाचनीय आहेत.

ते पुढे लिहितात, की.. ''जन्मतः भसाडा आवाज असलेल्या किशोरदांच्या.. पायाचे बोट स्वयंपाकघरातील सुरीमुळे कापले गेले आणि टाके घालण्यात आले. त्या वेदनेने किशोर पुढचे काही आठवडे ओरडत, रडत असे. योगायोग असा की त्यातून त्याच्या भसाड्या आवाजाचे रूपांतर अत्यंत तरल, मुलायम आवाजात झाले. के. एल. सैगल आणि खेमचंद प्रकाश हे आपले गुरू, असे किशोर नेहमी सांगत. सैगल यांना भेटल्यावर त्यांचीच गाणी पेश केली, तेव्हा सैगल यांनी किशोरच्या आवाजाची तारीफ करतानाच.. 'काही अंगदोष काढल्यास तू खचितच यशस्वी गायक होशील..' असा सल्ला दिला होता. असे अनेक किस्सेही या पुस्तकात आहेत. किशोरकुमार यांचे रूमा घोष, मधुबाला, योगिता बाली आणि लिना चंदावरकर यांच्याशी झालेले विवाह, वैवाहिक जीवनातील मधुर-कटू प्रसंगही यात आहेत. मधुबालाशी लग्न करायचे म्हणून किशोरकुमार यांनी धर्मांतर केल्याच्या वावड्या उठल्या होत्या. मात्र त्यांनी तसे केले नव्हते, असा संदर्भासह दिलेला नर्वाळा या पुस्तकात आहे. अमेरिका व इंग्लंड दौऱ्यानंतर त्यांनी घरात ठिकठिकाणी येशू ख्रिस्ताच्या लावलेल्या प्रतिमा, त्याने ख्रिस्ती धर्म स्वीकारला आहे का? असा दस्तुरखुद्द पंचमदांनी केलेला प्रश्न.. वगैरे बरीच माहिती या पुस्तकात आहे.

सेटवर उशिरा पोहोचणे, खोडकरपणा करत शूटिंग लांबवणे, इंदिरा गांधी यांनी लादलेल्या 'आणीबाणी' मध्ये सरकारी योजनांची जाहिरात करण्यासाठी संजय गांधी यांनी संपर्क साधूनही दिलेला नकार आणि ओढवून घेतलेली नाराजी. नंतर त्यांची गाणी व चित्रपट दाखवण्यास सरकारने घातलेली बंदी हा सारा तपशील यात आहे. यात इंदिराजींची हत्या झाल्यानंतर 'दूरदर्शन'वर येऊन 'पंथी हूं उस पथ का..' यासह तीन गाणी सादर करून वाहिलेली 'श्रद्धांजली' याचाही उल्लेख इथे आहे. आयकर चुकविल्याचे आरोप, त्यापायी 'पद्मश्री' पुरस्कार नाकारण्याचा सरकारी निर्णय, त्यानंतर आलेला विलक्षण ताण आणि हृदयविकाराचा झटका यावर लेखकांनी विस्ताराने लिहिले आहे. संपूर्ण कारकिदीबरोबरच बिनधास्त, संवेदनशील, बेफिकीर तरीही हळव्या, खोडकर असूनही तरल अशा किशोर यांची भेट पानोपानी होत राहते.

किशोरदा हा एक हरहुन्नरी, हरफनमौला कलावंत! पण ते 'स्टेज-शोज'ना जाम घाबरायचे. १९८२च्या आसपास 'दूरदर्शन'साठी एक कार्यक्रम करायचा होता. कल्याणजी-आनंदजींकडे संपूर्ण प्रोजेक्ट तयार असल्याने किशोरदांनी हो म्हणण्यास काहीच हरकत नव्हती. तालिमी सुरु झाल्या, कार्यक्रमाची घोषणा झाली तोच किशोरदांनी अचानक नकारघंटा

वाजवली. आयोजकांचे धाबे दणाणले. शेवटी आनंदजींनी शक्कल लढवली. मागून 'ट्रॅक' वाजवायचा आणि किशोरदांनी त्यावर फक्त अभिनय करायचा असं ठरलं. किशोरदा जाम खुश झाले. तो एपिसोड एक यादगार अनुभव ठरला. पब्लिक दुधखुळं नव्हतं. 'अरे रफ्ता रफ्ता, देखो आँख मेरी..' सादर होताच, ती गाणी 'ट्रॅक'वर वाजतायत व किशोरदा केवळ अभिनय करतायत ही बाब सर्वसामान्य प्रेक्षकांच्याही लक्षात आली. परंतु या कार्यक्रमाचं एकंदर सादरीकरणच इतकं भन्नाट होतं की ते सगळ्यांनाच आवडल्याचं तुम्हाला आठवतंच असेल. फायदा एकच झाला. किशोरदांची भीड चेपली. 'स्टेज-शोज' करण्याचं स्फूलिंग निर्माण झालं. यानंतर किशोरदांनी 'स्टेज-शो'चा धडाकाच लावला. 'कल्याणजी-आनंदजी नाईट'! किशोरदा, नितीन मुकेश, महेंद्र कपूर असे शोज व्हायला लागले. किशोरदा 'इन्कम-टॅक्स'च्या फेऱ्यात बऱ्याचदा अडकलेले. त्यांच्यावर अनेकवेळा धाडीही टाकल्या गेल्या होत्या. 'इन्कम-टॅक्स'च्या थकबाकी चुकवण्यासाठी त्यांनी 'लाईव्ह स्टेज-शो' हा उपाय आपलासा केला. कच्छच्या दुष्काळ फंडासाठी, अंध संस्थेसाठी अनेक 'चॅरिटी-शो' केले. कार्यक्रमाचा प्रस्ताव येताच 'मी फक्त तीनच गाणी गाणार हं!..' अशी धमकीवजा सूचना आधीच द्यायचे. 'मैं हूँ झुमरू..', 'खई के पान बनारसवाला..' अशी गाणी चेव आल्यागत म्हणायचे. लोळण घेत तर कधी उड्या मारत पब्लिक आणि स्टेज दणाणून सोडायचे. तीन गाण्यांची संख्या सर्वांनकळत चक्क बारावर जायची. चैतन्य नुसतं. फुल्टू धम्माल! (कृपया सोबत दिलेल्या 'प्ले-लिस्टस्' अवश्य पहा.) त्याचं हे चैतन्य शब्दात मांडताना आनंदजीभाईंचे डोळे नकळत पाणावले होते. असो! तर.. किशोरदांचं इकडे फिल्म्स्साठी पार्श्वगायन सुरूच होतं पण जीव जडलेला तो 'स्टेज-शोज'वर. किशोरदा शेवटी शेवटी म्हणजे ऑगस्ट १९८७च्या एका कार्यक्रमात म्हणालेले 'हा माझा शेवटचा शो असणार बहुतेक..'. आपल्या या खुषमिजाज मित्राचं, अमिताभ किंवा कल्याणजी-आनंदजींनी नेहमीसारखंच मनावर घेतलं नाही. हेच पहा ना! तीन गाण्यांची इनिंग खेळणारा बारा गाण्यांचा डाव रंगवतो.. होती की बरीच वर्षे. पण नाही! नियतीने डाव साधला. आपली सकाळ, दुपार, संध्याकाळ वेगवेगळ्या मूडमधल्या गाण्यांनी साजरी करणाऱ्या गायकाची एकसष्टीही साजरी करायला मिळू नये? मंगळवार दि. १३ ऑक्टोबर, १९८७ यादिवशी हा हरहुन्नर चैतन्ययात्री गायक आपल्याला सोडून गेला. कधीही न परतण्यासाठी. पण त्याने गायलेल्या मोजून दोन हजार नऊशे पाच गाण्यांतून तो नेहमीच आपल्याला भेटत राहणारेय.

© - अनंत पावसकर
('किशोर कुमार गौरव विशेषांक')



**हरहुन्नरी लाडका अभिनेता, पार्श्वगायक ‘किशोर कुमार’ यांची ‘आठवणीतली गाणी’ ‘यू-ट्युब’वर उपलब्ध झालेल्या या सर्वच्या सर्व.. ‘प्ले-लिस्टस्’ अवश्य पहा/ऐका !**

## किशोर कुमार - द ग्रेट : सर्व समावेशक ‘यू-ट्युब’च्या‘प्ले-लिस्ट’ :

https://youtube.com/playlist?list=PL3IktVe6Pi96Gd53GtqzSoeGKrsSv2DpJ&si=zfo9mBC482qtR2eu

## ‘यॉडेलिंग’ विषयी बोलू काही..

### १. किशोरकुमार यांची ‘यॉडेलिंग’ असलेली गाणी :

https://youtu.be/VUgG62XJnpo?si=jozb0bZpQ0x8zFz4

https://youtu.be/3aFL48Idd7A?si=urRwkNlncIjDn2mm

### २. महंमद रफी यांची ‘यॉडेलिंग’ असलेली गाणी :

https://youtu.be/qU4my702fpg?si=qicNHUekMxnGBnp0

https://youtu.be/96Kn3AUQXpc?si=-w4VxtMd8jNeDJWT

https://youtu.be/sn4LvG24qio?si=xRPuECUsMgzXsTsP

## किशोरकुमार यांची धम्माल विनोदी गाणी :

https://youtube.com/playlist?list=PLWjwx0avnxzHaMSwfu3ue0ZM-918CbG2q&si=CfVJCHGSo5iUDa8L

## अभिनेता किशोरकुमार यांच्यासाठी इतर गायकांनी पार्श्वगायन केलेली गाणी :

https://youtu.be/1hkzAK9X1wk?si=EL4PFKGUDb6NOywM

## किशोरकुमार यांच्या गाण्यांचे 'कराओके ट्रॅक्स्' :

https://youtube.com/playlist?list=PLR-KlU3SZ4akUrmv_AWcwwraNEhTdU23g&si=x9uRZytzcP6knmvi

**TRIBUTE TO THE LEGEND – KISHORE KUMAR**

लाडके पार्श्वगायक 'किशोर कुमार' यांची गाणी गाण्याचा, मी केलेला एक प्रयत्न :

https://www.youtube.com/playlist?list=PL3IktVe6Pi97JRCLLkPBbowVSYXIoB5Zw

© सर्व संकलन - अनंत पावसकर (पत्रकार व संगीत संयोजक)

♥




♥